महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्र.नाविमं/प.उ.मा./(8)1583
नागपूर,दिनांक २७/०५/२०२४

**प्रति,**

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :– उच्च माध्यमिक ( इ.१२वी ) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२४ परीक्षेस प्रविष्ठ विदयार्थ्यांच्या मुळ गुणपत्रिका व मार्च २०२५ परीक्षेकरीता प्रविष्ठ होणा–या विदयार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्र वितरणाबाबत.**

**संदर्भ :– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं/परीक्षा–२/२०२८ , दिनांक २७/०५/२०२४.**

उपरोक्त विषयानुसार आपल्या कनिष्ठ महाविदयालयामार्फत उच्च माध्यमिक ( इ.१२वी ) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२४ परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांच्या मुळ गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे अभिलेख व योग्यता प्रमाणपत्र, फॉर्म नं.१७ सोबतचे मुळ दस्ताऐवज **याचे वितरण नेहमीच्या जिल्हा वाटप केंदावर सोमवार, दिनांक <u>०३/०६/२०२४</u> रोजी वाटप करण्यात येणार आहे.** तरी सदर जिल्हा केंदावर आपल्या कनिष्ठ महाविदयालयाचा प्रतिनिधी अधिकार पत्रासह पाठवून स्विकारण्याची कार्यवाही करावी.

१. प्रथमत: आपणास प्राप्त झालेल्या सर्व गुणपत्रिका आपल्याच कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी अन्य कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करून आपल्या प्रतिनिधी मार्फत त्वरीत या कार्यालकडे जमा करण्यात याव्यात तसेच आपल्या कनिष्ठ महाविदयालयातील एखादया विदयार्थ्याची गुणपत्रिका प्राप्त न झाल्यास विनाविलंब मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.

२. सर्व गुणपत्रिकांवर मा.विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी त्याचबरोबर गुणपत्रिकेवरील नोंदी उदा. विदयार्थ्यांचे नांव, नावाचे स्पेलिंग व विषय इत्यादी माहिती कनिष्ठ महाविघालयाच्या अभिलेखावरून बिनचुक तपासण्यात याव्यात त्यानंतरच विद्यार्थ्यांस गुणपत्रिका वितरीत करण्यात याव्यात.

३. गुणपत्रिकेमध्ये काही त्रृटी असल्यास दुरूस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिण्याच्या आत (दि. **०३/०७/२०२४** अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरूस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहे.

**अ)** प्रति गुणपत्रिकेतील प्रत्येक चुकीच्या दुरूस्तीसाठी रूपये २००/– आणि नविन गुणत्रिकेसाठी रूपये २००/– असे एकुण ४००/–शुल्क भरावे लागेल.

**ब)** कनिष्ठ महाविदयालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विदयार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची प्राचार्यानी प्रमाणित केलेली छायांकित प्रत सादर करावी.

**क)** प्रिलिस्ट व प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर दुरूस्ती का कळविली नाही याबाबत संबंधित प्राचार्य व लिपिक याचा विभागीय सचिव याच्या नांवे वस्तूनिठ खुलासा सादर करावा. आपण दिलेला खुलासा हा समाधानकारक असावा

४. आपल्या कनिष्ठ महाविदयालयामार्फत गुणपत्रिका दुरूस्तीचे परीपूर्ण प्रस्ताव विहित मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरूस्तीची कार्यवाही केली जाईल तद्रनंतर काही त्रृटी राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविदयालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

**प्रतमाहितीस्तव :–**

**१. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव सादर.**

**२. शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया यांना माहितीस्तव सादर.**

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

C:\Users\admin\Desktop\आदेश.docx97

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-२/2028
पुणे - ४११ ००४
दिनांक-२७/०५/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय :-** फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख यांचे वाटप विभागीय मंडळांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना **सोमवार दिनांक ०३/०६/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजता करावयाचे असून उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे व स्थलांतर प्रमाणपत्रांचे वाटप करावयाचे आहे. त्यानुसार विभागीय मंडळ स्तरावर नियोजन करावे.

सदर बाब आपल्या विभागीय मंडळ कार्यकक्षेतील संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

उमाप

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी -
व्यवस्थापक,
गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ,
पुणे-०४